महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दुरध्वनी क्र:- Email ID:- smr2.sosd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.५८६/एसएम-२ दिनांक:- ११ जानेवारी, २०२२

## मान्यता पत्र

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
प्रितम मेडीकल फाऊंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर, नेअर सेचुरी एंन्का कॉलनी नं.३, पुणे नाशिक रोड, भोसरी, पुणे.

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

प्रितम मेडीकल फाऊंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर, नेअर सेचुरी एंन्का कॉलनी नं.३, पुणे नाशिक रोड, भोसरी, पुणे संचलित ग्लोबल टॅलेंट इंटरनॅशनल स्कूल, प्लॉट नं.०१, स.नं.१३, चिखली प्राधिकरण, ता.हवेली, जि.पुणे.

संदर्भ- इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.५८६/एसएम-२, दिनांक ०४.१०.२०२१.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत प्रितम मेडीकल फाऊंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर, नेअर सेचुरी एंन्का कॉलनी नं.३, पुणे नाशिक रोड, भोसरी, पुणे या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून ग्लोबल टॅलेंट इंटरनॅशनल स्कूल, प्लॉट नं.०१, स.नं.१३, चिखली प्राधिकरण, ता.हवेली, जि.पुणे या शाळेचा (प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. ६ वी ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम,सीबीएसई) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून प्रितम मेडीकल फाऊंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर, नेअर सेचुरी एंन्का कॉलनी नं.३, पुणे नाशिक रोड, भोसरी, पुणे संचलित ग्लोबल टॅलेंट इंटरनॅशनल स्कूल, प्लॉट नं.०१, स.नं.१३, चिखली प्राधिकरण, ता.हवेली, जि.पुणे या शाळेचा (प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. ६ वी ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सीबीएसई) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरिता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता सदर दर्जावाढ करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे:-

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित

Scanned with OKEN Scanner

केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ मधील निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्हाच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ही ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.ई. क्रमांक मिळवितील. सदरीबाबत, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

(इ.मु. काझी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक,मुंबई ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद ,
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
७. निवड नस्ती एसएस-१(१८८/२१)

Scanned with OKEN Scanner